# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ


कल्पतरू पॉईट, २/३ व ४ था मजला, शीव
माटुंगा स्किम नं ८, शीव (पूर्व), मुंबई-४०० ०२२.


"आपली सेवा आमचे कर्तव्य"

दिनांक २४/०६/२०२६

## जाहिरात

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामध्ये कामकाजाकरिता "विधी सल्लागार" हे पद राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ अथवा शासन सेवेतील सेवानिवृत्त अधिकाऱ्यांकडून निव्वळ कंत्राटी तत्वावर भरण्यासाठी पात्र उमदेवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

पदांचा तपशील, पदसंख्या सदर पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता, आवश्यक अनुभव व कंत्राटी पदाचे मानधन इत्यादी बाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | पद | शैक्षणिक पात्रता | अनुभव | कमाल वयोमर्यादा | प्रस्तावित जागा | प्रस्तावित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | विधी सल्लागार | L.L.B | राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ अथवा शासन सेवेतील विधी विषयक कामकाजाचा किमान ५ वर्षाचा अनुभव असावा. प्रदूषण नियंत्रण मंडळामध्ये अनुभव असल्यास प्राधान्य. | ६५ वर्ष | ०१ | सा.प्र.वि. शासन निर्णय दिनांक १० जून २०२५ |

**अटी व शर्ती :**

१. उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा नागरीक असावा.
२. संगणक हाताळणी व इंटरनेटचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक राहील.
३. उच्चतम वयोमर्यादा दिनांक ०१/०५/२०२६ रोजीची ग्राहय धरण्यात येईल.
४. जाहिरातीतील पद मंडळातील नियमित पद नसून सदर पद निव्वळ कंत्राटी स्वरुपाचे आहे. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही.
५. आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांनी सदर पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.
६. सदर नियुक्ती १२ महिन्यांकरिता राहील. त्यानंतर उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे आवश्यकतेनुसार पुनर्नियुक्ती/मुदतवाढ देण्यात येईल.

**उमेदवारांकरिता सर्वसाधारण** सूचनाः

१. सदर पदासाठी अर्जाचा नमुना www.mpcb.gov.in/recruitment या लिंकवरुन Download करुन सदर अर्जामध्ये छायाचित्रासहीत परिपूर्ण अर्ज recruitment@mpcb.gov.in या ईमेल आयडीवर पाठविण्यात यावेत.
२. अर्जावर पदाचे नाव ठळकपणे नमूद केलेले असावे.
३. अर्जासोबत उमेदवाराने आपला ई-मेल आयडी नमूद करणे अनिवार्य आहे व इतर संपूर्ण माहिती,(शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे/प्रमाणपत्रे, अनुभव इ.) जोडावी.
४. अर्जासोबत मूळ कागदपत्रे जोडू नयेत फक्त स्वसाक्षांकित केलेल्या छायांकित प्रती जोडण्यात याव्यात.
५. वरील पध्दतीने अर्ज सादर करण्याचा कालावधी २४/०६/२०२६ ते ०३/०७/२०२६ असा आहे.
६. पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी फक्त ई-मेल द्वारे कळविण्यात येईल.
७. तसेच या संदर्भातील शासनाकडून वेळोवेळी निर्गमित होणारे शासन निर्णय, सूचना लागू राहतील.
८. भरती करावयाच्या पदसंख्येत वाढ किंवा घट करण्याचे अधिकार मंडळाच्या सक्षम प्राधिकारी यांना राहतील.

**सदस्य सचिव**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ**